# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०४/०३/२०१८**

## १) विनयभंग :-

**भाग्यनगर :-** दिनांक ०३.०३.२०१८ रोजीचे ०१.०० वा. चे सुमारास गजानन अपार्टमेंट विर सावरकरनगर नांदेड येथे यातील फिर्यादी महिला ही रात्री घरात झोपली असता यातील नमुद आरोपीने घरात प्रवेश करुन चोरी करण्याचा प्रयत्न करुन फिर्यादी महिलेचा विनयभंग केला. वगैरे **२८ वर्षीय महिला फिर्यादी व्यवसाय घरकाम रा. अंतरगाव ता. नायगाव ह.मु. गजानन आपार्टमेंट विर सावरकरनगर नांदेड** हिने दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. भाग्यनगर** गुरनं ५२/२०१८ कलम ३५४, ४५७, ३८०, ५११ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/ २१८७ व्ही.पी. आल्लेवार मो.क्र. ९१५८७५६०८७** हे करीत आहेत.

## २) पळवून नेले :-

**इतवारा :-** दिनांक २७.०२.२०१८ रोजी ०७.०० वा.चे सुमारास फिर्यादीचे राहते घर शक्तीनगरपासुन ते शारदा भवन शाळापर्यंत नांदेड येथे, यातील **फिर्यादीचा मुलगा नामे साईनाथ संजु खुणे वय ०९ वर्ष व्यवसाय शिक्षण रा. शक्तीनगर नांदेड** हा शाळेत जातो म्हणुन घरातुन गेला असता अदयाप पावेतो परत आला नाही. त्यास कुणीतरी अज्ञात आरोपीने आज्ञात कारणावरुन पळवून नेले वगैरे **फिर्यादी आजय शिवाजीराव बोकेफोडे वय २३ वर्षे व्यवसाय मजुरी रा. शक्तीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरनं ७३/२०१८ कलम ३६३ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/ चौधरी, मो. नं. ७२४९२२९७२९** हे करीत आहेत.

## ३) गळफास घेवुन आकस्मात मृत्यु :-

**अ) विमानतळ :-** दिनांक ०३.०३.२०१८ रोजी चे १९.३० वा. चे सुमारास शाहुनगर नांदेड येथे यातील **मयत नामे ॠतुजा पि. प्रतापराव देशमुख वय १७ वर्षे रा. वडगाव ता. कळमनुरी ह.मु. शाहुनगर नांदेड** ही बारावीची परिक्षेचा तणाव घेऊन जिवनास कंटाळुन लुगडयाने टिन पत्र्याच्या अँगलला गळफास घेवुन मरण पावली. वगैरे **खबर देणार सतीश दिगांबर देशमुख वय ४५ वर्षे व्यवसाय नौकरी मुख्याध्यापक रा. शाहुनगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** आ.मृ. ०६/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहकॉ/ १७६० गुट्टे मो.क्र. ९९२३७९५७६०** हे करीत आहेत.

**ब) किनवट :-** दिनांक ०२.०३.२०१८ रोजी चे रात्री वेळ नक्की नाही बोधडी (बु.) ता. किनवट जि. नांदेड येथे यातील **मयत नामे सुरेश नारायण शेळके वय २० वर्षे व्यवसाय शेती रा. बोधडी (बु.) ता. किनवट जि. नांदेड** हा रात्री शेतात जागलीसाठी गेला असता अज्ञात कारणावरुन अंब्याच्या झाडाला गळफास घेवुन मरण पावला. वगैरे **खबर देणार लालाजी नथु शेळके वय ३० वर्षे व्यवसाय शेती रा. बोधडी (बु.) ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. किनवट** आ.मृ. ०६/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ ३०२ सावंत मो.क्र. ९९२३६१२४०२** हे करीत आहेत.

## ४) विषारी साप चावुन मृत्यु :-

**सोनखेड :-** दिनांक ०२.०३.२०१८ रोजी चे ०७.०० ते ०९.१० वा. चे दरम्यान फिर्यादीचे घरी पेन्नुर ता. लोहा जि. नांदेड येथे यातील **मयत नामे रुक्मीणबाई भ्र. बुध्दीराम प्रकंडकर वय ६० वर्षे व्यवसाय घरकाम रा. पेन्नुर ता. लोहा जि. नांदेड** ही पाण्याच्या टाकीजवळुन डब्बा आणत असताना विषारी सापाने हाताचे बोटाला चावल्यामुळे तिचा मृत्यु झाला. वगैरे **खबर देणार कोंडीबा बुध्दीराम प्रकंडकर वय ३७वर्षे व्यवसाय किराणा दुकाण रा. पेन्नुर ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. सोनखेड** आ.मृ. ०४/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोना/ २४८३ साखरे मो.क्र. ९८२३०१५४८३** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४